# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक १५/०३/२०२४ (शुक्रवार) सायंकाळ

---

### रामटेक पोलीसांनी अवैध जनावरांची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना पकडून जनावरांना दिले जिवनदान

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत मौजा चाचेर येथे दिनांक १४/०३/२०२४ चे ०९.०० वा. ०९.३० वा. दरम्यान रामटेक पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन रामटेक पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन **आरोपी नामे– ०१) प्रल्हाद चुन्नीलाल लांजेवार, ४८ वर्ष, रा. भागवतटोला त. जि. गोंदीया २) अमोल शिवचरण हटवार वय २२ वर्ष रा. अंबागड ता. तुमसर जि. भंडारा** याचे ताब्यातील बोलेरो पिकअप गाडी क्र. एम एच.– ३५/एजे १९४१ किंमती अंदाजे ५,००,०००/–रू. मध्ये ०२ म्हशी व ०२ हेले प्रत्येकी किंमती २५०००/–रू. प्रमाणे १०००००/– रू. तसेच टाटा पिकअप गाडी क्र. एम. एच.–४०/बीजी ३२६१ किंमती अंदाजे ३,००,०००/– रू. मध्ये ३ म्हशी व ०२ हेले २५०००/– रू. प्रमाणे १२५०००/– रू. चे सदर वाहनामध्ये अत्यंत क्रुर व निर्दयतेने डांबुन कोणत्याही चारापाण्याची व्यवस्था न करता अवैध जनावरांची वाहतुक करतांना मिळून आल्याने आरोपीचे ताब्यातून असा एकुण १०,२५०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी पोलीस हवालदार उमेश नंदलाल परसगाये यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ११ (१) (ड) प्रा.छ.प्र.अधि १९६० काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक गोपाल डोकरमारे पो.स्टे रामटेक हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे रामटेक येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक प्रशांत काळे, नापोशि गोपाल डोकरमारे, चापोशि विशाल चव्हान, पोशि उमेश परसगाये यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर